


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



दि. 14 ते 20 एप्रिल 2024 या कालावधीत संपूर्ण राज्यात अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कन्ना चौक येथील अग्निशामक केंद्र येथे आज महापालिकेचे सहाय्यक

Volume III Issue 02 Date 14-04-2024

## अग्निशमन सेवा सप्ताह दि. 14 ते 20 एप्रिल 2024

“अग्नि सुरक्षा सुनिश्चित करें, राष्ट्रीय निर्माण में योगदान दें |”
“Ensure Fire Safety, Contribute towards Nation Building”

14 एप्रिल 1944 रोजी मुंबई गोदीत झालेल्या यप्रचंड स्फोटामध्ये लागलेली अत्यंत भीषण आग विझविताना मुंबई अग्निशामक दलातील 66 कर्मचाऱ्यांना इतर अनेक जण प्राणास मुकले. तसेच अग्निशमन कार्य करतांना हुतात्मा झालेल्या अग्निशमन दलातील अग्निशमन अधिकारी / कर्मचारी यांच्या स्मरणार्थ केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सूचनेनूसार प्रतिवर्षा प्रमाणे यंदाही दि. 14 ते 20 एप्रिल 2024 या कालावधीत संपूर्ण राज्यात अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो त्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कन्ना चौक येथील अग्निशामक केंद्र येथे आज महापालिकेचे सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांच्या हस्ते अग्निशामक सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन समिती कडून मंजूर निधीतून अग्निशामक जवानांना आगीपासून बचाव होण्यासाठी अग्निशामक सेप्टी किट सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.यावेळी यावेळी अग्निशामक दलाचे प्रमुख केदार आवटे, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे, जनसंपर्क अधिकारी श्री गणेश बिराजदार, मल्लिकार्जुन हुणजे, सहाय्यक अग्निशमन अधिकारी अवचित दुधाळ तसेच अग्निशामन विभागाकडील कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

सदर सप्ताह काळात देशातील सर्व अग्निशमन संस्था, विविध औद्योगिक संस्था यांचे तर्फे सप्ताह पाळण्यात येवून सदर सप्ताहात आग लागू नये म्हणून घ्यावयाची काळजी व दक्षता तसेच आग लागल्यास कोणतेही कार्यवाही करावी त्यासंबंधी सविस्तर माहिती दलाकडून लोकांना दिली जाते.

देशात आगीमुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचे नुकसार होते. तर अनेक जणांचे प्राण आगीमध्ये गमवावे लागतात. एवढी मोठी प्रचंड मालमत्तेची हानी भारता सारख्या गरीब देशात न परवडणारी आहे. आगीमुळे मालमत्तेचे नुकसारन परत भरु निघू शकत नाही. विमा कंपनी व्दारे मिळणारी मदत ही फार अल्पशी असते व बऱ्याचशा मालमत्तेचे विमाही केलेले नसते. त्यामुळे हजारो लोकांचे संसार पार धुळीस मिळतात व हजारों कामगार बेकार होतात. तसेच आगीमुळे मृत्यू पावलेले व्यक्ती पुन्हा जिवेत करता येत नाही.

आहे

आगी ही आपोआप कधीही लागत नाही. बऱ्याच वेळेला आपल्या बेपर्वाने व सुरक्षितेचे नियम न पाळल्यामुळे लागते. आग ही आपल्या शत्रु समजून तिच्या पासून आपले व आपल्या मालमत्तेचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकांचे काम आहे. त्यासाठी आग का लागते व लागल्यास कोणते उपाय योजना करण्यात यावीत याची माहिती करुन घेणे हे प्रत्येक नागरिकांचे काम असून, आपले दैनंदिन जीवनात त्याचे आचरण करणे आवश्यकआहे.

वरील बाबतची माहिती देशातील अग्निशामक दलामार्फत सेवा सप्ताहात काळात, भाषणे, वर्तमान पत्रातून लेख, टी.व्ही. व फिल्म इ. दाखवून संपूर्ण माहिती दिली जाते. तेव्हा या सर्वांचा अभ्यास करुन त्याची अंमलबजावणी केल्यास देशातील आगीपासून होणारे मालमत्तेचे व जिविताचे प्रचंड नुकसान निश्चितपणे कमी करता येईल. सोलापूर महानगरपालिका अग्निशामक दल हे नागरिकांचे जिविताचे व मालमत्तेचे संरक्षण करिता 24 तास विनामुल्य सेवा उपलब्ध आहे. सोलापूर शहरात एकूण 5 ठिकाणी अग्निशामक केंद्रे असून ते पुढील प्रमाणे आहेत.

1. रविवार पेठ, मुख्य अग्निशामक केंद्र फोन नं. 101, 2740364
2. भवानी पेठ, अग्निशामक केंद्र फोन नं. 2740367
3. सावरकर मैदान, अग्निशामक केंद्र फोन नं. 2740368
4. होटगी रोड, अग्निशामक केंद्र फोन नं. 2740389.
5. अक्कलकोट रोड, MIDC अग्निशामक केंद्र. 2740366

व मुख्य अग्निशमन अधिकारी मोबाईल नं. 9422457936

सध्या दलाकडे सर्व मिळून 9 गाड्या असून तसेच अरुंद रस्ते व लहान गल्लीबोळ मधील आग विझविण्याकामी एक मिनी फायर फायटर वाहन, दोन फोम टेंडर फायर फायटर गाड्या दलात उपलब्ध आहे. सदर फोम टेंडर फायर फायटर वाहनाचा उपयोग विमानतळ बंदोबस्त अथवा केमिकलच्या आगीवर अत्यंत उपयुक्त असे वाहन उपलब्ध आहे.

आपत्ती व मदत पुनर्वसन मंत्रालय महाराष्ट्र शासन, यांच्या कडून Quick Response Vehicle (Rescue Van) विनामुल्य म.न.पा. स प्राप्त झाले आहे. म.न.पा. हद्दीमध्ये कोणतेही आग व अपघात मदत कार्यास फी द्यावी लागत नाही. सोलापूर शहरातील जनतेसाठी आग व अपघात, आणीबाणी प्रसंगी 24 तास विनामुल्य सेवा उपलब्ध आहे.

सदर अग्निशमन दिनाबद्दलचे माहिती सोलापूर महानगरपालिका अग्निशामक दलाच्या वतीने देण्यात येत आहे